# रॉबिनहूडची साहसकथा

**सर विल्यम स्कॉट**

अनुवाद

**वैशाली गोखले**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**रॉबिनहूडची साहसकथा :** सर विल्यम स्कॉट
अनुवाद : वैशाली गोखले

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
वैशाली विजय गोखले
१००४/२ब, ए वार्ड,
न्यू महाद्वार रोड, कोल्हापूर
मो. नं. : ७५८८११३०८०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २१०/-

# रॉबिनहूडची साहसकथा

**खूप** खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही! इंग्लंडमध्ये एक राजा राज्य करीत होता. त्याचं नाव होतं हेन्री! त्याला शिकारीची फारच आवड होती. त्या काळी इंग्लंडमध्ये खूप मोठमोठी जंगलं होती. त्या जंगलात शिकार करण्याची मुभा ही फक्त राजाला आणि त्याच्या साथीदारांव्यतिरिक्त, इतर कुणालाही नव्हती. जर कुणी बाहेरचा शिकारी चुकून तिथे आला, तर लगेच त्याला पकडून कैद केलं जायचं. त्यातूनही एखाद्यानं नजर चुकवून तिथल्या प्राण्याची शिकार केली आणि तो राजाच्या शिपायांच्या हाती सापडला, तर त्याला सरळ फाशीची शिक्षा दिली जायची.

नॉटिंगहॅम शहराजवळ एक शेरवुड नावाचं जंगल होतं. अगदी तसंच एक जंगल बर्न्सडेल शहराजवळही होतं. शेरवुड जंगलाच्या देखरेखीसाठी राजानं ज्या माणसाची नेमणूक केली होती, त्याचं नाव होतं फिटजुथ!

या फिटजुथला रॉबर्ट नावाचा एक मुलगा होता. अगदी छोटा असल्यापासूनच तो वडिलांबरोबर त्या जंगलात सगळीकडं फिरायचा. त्यामुळं त्या जंगलातली सगळी झाडं, झुडपं, वेली, पशू, पक्षी, किडे यांच्याशी त्याची छान ओळख झाली होती. थोडा मोठा झाल्यावर तर तो हातात धनुष्यबाण घेऊन एकटाच जंगलात फिरायला जायला लागला. त्यामुळं थोड्याच दिवसांत तो पट्टीचा नेमबाज बनला.

रॉबर्टचे वडील त्याला नेहमी डाकूंच्या, लुटारूंच्या सुरस कथा सांगायचे. अशा साहसपूर्ण कथा ऐकायला रॉबर्टला फारच आवडायच्या. काही दिवसांनंतर रॉबर्टला आपणही अशी धाडसी कामं करावीत, असं वाटायला लागलं.

नॉटिंगहॅम शहराजवळ रॉबर्टचे एक काका राहायचे. त्यांच्या मुलाचं नाव होतं विल! शेरवुडच्या जंगलातच, पण जरा लांब अंतरावर हंटिंग्टनचा किल्ला होता. तिथं एक श्रीमंत माणूस राहत होता. त्याच्या मुलीचं नाव मेरियन होतं. मेरियन, विल आणि रॉबर्ट यांची लहानपणापासूनच मैत्री होती. ती तिघंही वरचेवर जंगलात भटकायला जायची आणि खेळायचही एकत्रच! मात्र रॉबर्टचे वडील

आणि मेरियनचे वडील एकमेकांचे अगदी कट्टर शत्रू होते. लोक तर असं म्हणायचे की, राजाच्या मदतीनं रॉबर्टच्या वडिलांची दरबारातून हकालपट्टी करूनच मेरियनचे वडील स्वत: अगदी श्रीमंत झाले होते. त्यामुळंच खूप वर्षांपासून त्यांच्यातून विस्तवही जात नव्हता; पण या गोष्टीकडं मुळीच लक्ष न देता मेरियन आणि रॉबर्ट एकमेकांशी एकदिलानं खेळायचे.

नॉटिंगहॅम शहराचा कोतवाल आणि हरफिल्डचा फादर हेसुद्धा रॉबर्टच्या वडिलांशी शत्रुत्वानंच वागायचे. हंटिंग्टनचा तो श्रीमंत माणूस, कोतवाल आणि फादर यांनी संगनमत करून रॉबर्टच्या वडिलांविरुद्ध राजाचे कान फुंकायचं काम केलं होतं, त्यामुळं राजानं त्यांना दरबारच्या नोकरीतून कमी केलं होतं.

रॉबर्ट अवघा एकोणीस वर्षांचा होता, तेव्हाची ही घटना आहे. रॉबर्टनं आपल्या वडिलांना – फिटजुथना अखेर धाडस करून एक दिवस विचारलं की, नॉटिंगहॅमचा कोतवाल, हरफिल्डचा फादर आणि हंटिंग्टनचा श्रीमंत माणूस म्हणजेच मेरियनचे वडील हे तिघे त्यांच्याशी वैर का करतात?

स्वत:च्या मुलाचं – रॉबर्टचं हे बोलणं ऐकल्यावर फिटजुथनी आधी त्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं शिताफीनं टाळलं; पण रॉबर्ट आपल्या प्रश्नाच्या उत्तरासाठी अडूनच बसला.

रॉबर्टचं म्हणणं असं होतं की, तो स्वत:, मेरियन आणि विल यांना एकत्र खेळताना पाहून लोक त्यांच्याविषयी म्हणजे फिटजुथविषयी नाना तऱ्हांनी बोलतात.

''काय बोलतात बरं?'' फिटजुथनी विचारलं.

''तुमच्याविषयी बोलताना ते म्हणतात की, तुम्ही राजद्रोही आहात, राजाच्या दरबारात नोकरी करत असताना तुम्ही राजाची सत्ता उलथून पाडण्यासाठी कट-कारस्थान केलं होतं. म्हणूनच म्हणे राजानं तुमचं उच्च पद काढून घेतलं आणि कनिष्ठ पदावर तुमची नियुक्ती केली. अशा प्रकारे राजानं तुम्हाला शिक्षा केली होती.''

मुलाचं हे बोलणं ऐकून फिटजुथच्या चेहऱ्यावर संभ्रम, दु:ख आणि बेचैनीचे भाव उमटले. काही वेळ ते तसेच शांत राहिले पण नंतर कळवळून म्हणाले, ''नाही रे बाळा! हे सगळं अगदी धादांत खोटं आहे. मी तर राजाशी नेहमीच प्रामाणिक होतो. राजाचाही माझ्यावर खूपच विश्वास होता. माझं शौर्य आणि विश्वासूपणा यामुळं राजा हेन्री माझ्यावर नेहमीच प्रसन्न असायचा.''

''असं सगळं होतं तर मग,'' रॉबर्ट म्हणाला, ''हंटिंग्टनचा श्रीमंत, नॉटिंगहॅमचा कोतवाल आणि हरफिल्डचा फादर हे तिघे तुमचे शत्रू कसे झाले? आणि लोकसुद्धा त्यांचंच म्हणणं पुन्हा पुन्हा का सांगतात?''

मुलाचा हा प्रश्न ऐकून फिटजुथ भावविवश झाले. त्यांचं मन घायाळ झालं. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.

वडिलांच्या डोळ्यांतले अश्रू पाहून रॉबर्टलाही दुःख झालं. दुःखी स्वरात त्यानं आपल्या वडिलांना विचारलं, ''बाबा, अखेर झालंय तरी काय? माझ्या या प्रश्नानं इतके का दुखावलात?''

''अरे बाबा, मला अतोनात दुःख व्हावं असंच सगळं घडलं आहे,'' हे सांगताना फिटजुथांचा कंठ दाटून आला. ''जेव्हा एखाद्या निर्दोष माणसावर खोटे आरोप केले जातात... किंवा त्याच्याविरुद्ध खोट्या वावड्या उठवल्या जातात, तेव्हा त्याचं काळीज फाटून जातं. असंच माझ्या बाबतीतही घडलं आहे. राजाच्या दरबारात माझ्यावर खोटे आरोप केले गेले. माझ्याविरुद्ध खोटा प्रचारही केला गेला; पण त्या बाबतीत मी मात्र काहीच करू शकलो नाही.''

''पण कसला खोटा आरोप तुमच्यावर झाला? आणि खोटा प्रचार तरी कसला केला गेला?'' रॉबर्टनं भावविवश होत निष्पाप स्वरात विचारलं.

रॉबर्टच्या विचारण्यातला निष्पाप भोळा भाव पाहून फिटजुथना भावना अनावर झाल्या. त्यांना राहवलं नाही. एक खोल श्वास घेत त्यांनी आपले अश्रू पुसले आणि ते म्हणाले, ''रॉबर्ट बाळा! या जगातले लोक फार विचित्र असतात. त्यांना कुणाची प्रगती झालेली पाहवत नाही. एखादा प्रतिभावान माणूस आपल्या प्रतिभेच्या बळावर प्रगतीच्या पायऱ्या चढण्याचा यशस्वी प्रयत्न करायला लागला की, सगळे लोक जणू त्याचे शत्रूच बनतात. त्या माणसाचा सत्यानाश व्हावा, तो धुळीला मिळावा म्हणून ते कटकारस्थानं आणि विपरीत प्रयत्न करायला सज्ज होतात.''

''तुमच्या बाबतीतही नेमकं असंच झालं का?'' रॉबर्टनं विचारलं.

''होय रे लेकरा, माझ्या बाबतीत हे असंच झालं.'' फिटजुथ म्हणाले.

''मग सगळं सांगा ना बाबा.'' रॉबर्ट अत्यंत उत्सुकतेनं म्हणाला, ''मला सगळं सविस्तर जाणून घ्यायचं आहे.''

''ठीक आहे, पुत्रा!'' फिटजुथनी खोलवर श्वास घेत सांगायला सुरुवात केली. ''राजा हेन्रीच्या दरबारात माझ्यावर जो घोर प्रसंग गुदरला, त्याविषयी आज मी तुला सर्व सांगतो. हंटिंग्टनचा धनिक, नॉटिंगहॅम शहराचा कोतवाल आणि हरफिल्डचा फादर हे माझे शत्रू का झाले, हेसुद्धा आज मी तुला सांगणार आहे. त्याशिवाय त्यांनी राजाशी हातमिळवणी करून माझ्याविरुद्ध कोणतं कारस्थान केलं हे सगळं आज तुला सविस्तरपणे सांगणारच आहे,'' असं म्हणत असतानाच फिटजुथची नजर शून्यात हरवली, ते स्वत:च्या भूतकाळात शिरून जणू हरवून गेले आणि त्यांच्या स्मरणशक्तीनं खूप पूर्वीच्या काळात प्रवेश केला.

''मुला, तू अजून जन्मला नव्हतास त्या काळातली ही घटना आहे. त्यावेळी माझं लग्नही झालं नव्हतं, त्यामुळे तुझ्या जन्माची शक्यताही नव्हती. मला ना, लहानपणापासूनच धनुष्यबाणासारखी शस्त्रं हाताळून पाहण्याची आवड होती. माझा नेमही अगदी अचूकपणे लक्ष्य भेदायचा. माझा जन्म नॉटिंगहॅम शहरात झाला आणि साहजिकच मी तुझ्या आजी-आजोबांबरोबर मजेत राहत होतो. मी त्यांचं एकुलतं एक अपत्य होतो, त्यामुळं ते दोघंही माझं खूपच कोडकौतुक करायचे. असाच काही काळ गेला आणि त्या दोघांचंही निधन झालं. त्यामुळं मी अगदीच एकाकी झालो होतो. काही न सुचल्यामुळं मी इकडंतिकडं भटकायला लागलो. सगळं जग मला प्रेमाशिवाय सुनंसुनं वाटायला लागलं होतं. अशा अवस्थेत मी जगत असताना माझ्या आयुष्यात एक महत्त्वाचं वळण आलं.''

''कसलं होतं हो, हे महत्त्वाचं वळण, बाबा?'' रॉबर्टनं विचारलं. आपल्या वडिलांचं बोलणं तो फार उत्सुकतेनं ऐकत होता.

फिटजुथ पुढं सांगायला लागले, ''ते वळण होतं नेमबाजीच्या स्पर्धेचं! राजानंच ही धनुर्विद्येची स्पर्धा आयोजित केली होती. संपूर्ण राज्यभरातले नेमबाज त्यात भाग घेणार होते. ही स्पर्धा हंटिंग्टनच्या किल्ल्यात होणार होती. मला जेव्हा ही बातमी कळली, तेव्हा माझी पावलं आपसूचकच हंटिंग्टनच्या किल्ल्याकडं वळली. त्या स्पर्धेत भाग घ्यायचा माझा उद्देश नव्हता; पण नेमबाजीत मी चांगलंच कौशल्य प्राप्त केलं होतं आणि या खेळाची मला विलक्षण आवड होती. या स्पर्धेत कोणते कसलेले नेमबाज भाग घेताहेत ते पाहावं, त्यांच्या विद्येचे

आणि कलेचे प्रत्यक्ष प्रयोग न्याहाळावेत आणि त्यांच्यासारखं प्राविण्य प्राप्त करण्यासाठी आपण प्रयत्न आणि सरावही करावा, अशी मला इच्छा झाली आणि म्हणूनच मी या स्पर्धेच्या ठिकाणी जाण्यासाठी निघालो.

रॉबर्टचे वडील मध्ये काही क्षण थांबले आणि नंतर त्यांनी पुन्हा बोलायला सुरुवात केली, ''मी हंटिंग्टनच्या किल्ल्यात पोहोचलो, तेव्हा तिथं खूपच गर्दी झाली होती. चारी बाजूंनी जनसागरच जणू उसळला होता. दूरवरच्या भागातून आलेले नेमबाज एका रांगेत उभे होते. ते दृश्य पाहताना मला फारच मौज वाटत होती. काही वेळानं स्पर्धेला सुरुवात झाली. एका झाडावर कच्ची केळी लोंबकळत ठेवली होती. बाणानं त्यांचा वेध घ्यायचा होता. सगळ्या नेमबाजांचा नेम त्यांच्यावर अचूकपणे बसला. त्यानंतर नेमबाजांच्या संख्येएवढ्याच मेणबत्त्या एका ओळीत ठेवण्यात आल्या. फक्त एक सोडून बाकी सगळ्या नेमबाजांनी त्या मेणबत्त्यांचा अचूक वेध घेतला. ज्या एकाला हे जमलं नाही, त्याला स्पर्धेतून बाद करण्यात आलं.''

आपल्या वडिलांच्या तोंडून ही सगळी हकीकत रॉबर्ट अगदी लक्षपूर्वक ऐकत होता. वडील थांबलेले पाहून रॉबर्टनं मोठ्या औत्सुक्यानं विचारलं, ''मग पुढं काय झालं?''

''पुढं असं झालं, बाळ रॉबर्ट,'' फिटजुथ म्हणाले, ''नंतर त्या मेणबत्त्या पेटवण्यात आल्या आणि बाणानं त्या मेणबत्त्यांच्या ज्योती विझवायला त्या नेमबाजांना सांगण्यात आलं. ही अट पूर्ण करण्यात फक्त दोनच नेमबाज यशस्वी झाले. आता स्पर्धेच्या पुढच्या म्हणजे अंतिम फेरीत हे दोनच नेमबाज उरले. आता त्यांच्यातूनच स्पर्धेचा विजेता निवडला जाणार होता. शेवटच्या फेरीसाठी लक्ष्य म्हणून काही अंतरावर या दोन मेणबत्त्या दोऱ्याला बांधून लटकवण्यात आल्या. त्या दोऱ्यावर नेम साधून मेणबत्ती खाली पाडायची होती. दोन्ही नेमबाजांनी त्या दोऱ्यांवर नेम धरून बाण सोडले; पण दोघांनाही दोरा तोडणं शक्य झालं नाही.

''त्या दोघांच्याही चेहऱ्यावर निराशेची भावना पसलेली मला दिसली. आता अशा स्थितीत विजेत्याचा निर्णय घेणं अवघड झालं होतं. त्यामुळं वातावरणात एक तणावपूर्ण शांतता पसरली.

''आता प्रश्न असा निर्माण झाला की, विजयाचा निर्णय घ्यायचा कसा? कारण स्पर्धेतील दोन्ही अंतिम उमेदवार अयशस्वी ठरले होते. त्यावेळी तिथं राजा हेन्रीही उपस्थित होताच. मग थोडी सल्लामसलत केली गेली. बरीच चर्चा झाल्यावर राजाच्या वतीनं घोषणा करण्यात आली की, उपस्थित प्रेक्षकांपैकी जर कोणी मेणबत्तीचा दोरा तोडण्यात यशस्वी झाला, तर राजा त्याला आपलं सेनापतीपद देऊ करेल.

''काही वेळ तिथं विचित्र शांतता पसरली; पण एकही माणूस ही अवघड परीक्षा द्यायला तयार झाला नाही. जर कोणी स्पर्धक पुढं आला नसता, तर त्या दोघा अंतिम स्पर्धकांनाच बक्षीस दिलं जाणार होतं. न जाणो तेव्हा मला काय वाटलं, पण मी उठून उभा राहिलो आणि मोठ्या आवाजात म्हणालो, 'थांबा! अंतिम परीक्षा द्यायला मी येतो आहे.'

मी असं म्हटल्याबरोबर सगळ्या लोकांच्या नजरा माझ्याकडं वळल्या. राजा हेन्रीनं माझ्याकडं पाहिलं आणि स्मितहास्य केलं. त्यानं जवळ येण्याची खूण मला केली, तसा मी उठून राजाच्या नजीक गेलो. राजानं मला विचारलं, 'तू अंतिम लक्ष्याचा नेमका वेध घेऊ शकतोस का?'

'हो महाराज,' मी आत्मविश्वासानं उत्तर दिलं.

''याचा अर्थ तूही नेमबाज आहेस. मग तू स्पर्धेत भाग का नाही घेतलास?''

'मी तर फक्त सामना बघायला आलो होतो,' मी म्हणालो, 'पण जेव्हा मी पाहिलं की, शेवटचे दोन नेमबाज मेणबत्त्यांच्या दोऱ्यांचा वेध घेऊ शकले नाहीत, तेव्हा मला फारच आश्चर्य वाटलं. या दोऱ्यांचा वेध घेणं म्हणजे माझ्यासाठी फारच क्षुल्लक बाब आहे.'

माझं बोलणं ऐकून राजाला फारच नवल वाटलं. तो म्हणाला, 'अरे, हे दोन नेमबाज हे देशातले फार प्रसिद्ध नेमबाज आहेत. आपल्या बाणांनी या दोऱ्यांचा वेध घेणं ही गोष्ट जर त्यांनाही जमली नाही, तर तू कसं काय ठामपणे सांगू शकतोस की, तू नेम लावून या दोऱ्या नक्की तोडशील?'

'मी फक्त सांगत नाहीय,' मी म्हटलं, 'तुमची परवानगी असेल तर मी माझं म्हणणं प्रत्यक्ष कृतीनं सिद्ध करू शकतो.'

'छान!' राजा हेन्रीनं आश्चर्यचकित होऊन म्हटलं, 'असंच जर तुझं म्हणणं असेल तर मी तुला पूर्ण परवानगी देतो आणि वचनही देतो की, तू जर सांगितलेल्या लक्ष्याचा अचूक वेध घेतलास तर तुला मी माझ्या राज्याचा सेनापती करीन.'